**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६**
अकृषिक परवानगीविषयक कार्यवाही आणि जमीन महसूल थकबाकीवर व्याज लागू होणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र:-एनएपी १०/२०००/प्र.क्र.१५/ल-२
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक:- ९ फेब्रुवारी,२०००.

***शासन परिपत्रक:-***

वर नमूद विषयांच्या अनुषंगाने महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी महाराष्ट्र अध्यादेश क्र: १८/९९, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) अध्यादेश, १९९९ हा दिनांक ६/८/९९ ला प्रख्यापित केला व त्या दिवसापासून तो लागू झाला. त्यानंतर सदर अध्यादेश, महाराष्ट्र अध्यादेश क्र. ३०/९९, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा आणि पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ म्हणून पुनर्प्रख्यापित केला.

अध्यादेशाने उपरोक्त अधिनियमात केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने त्यानंतर लगेच विधीमंडळ अधिवेशन सुरु झाल्यापासून ६ आठवडयांचे आत विधी मंडळात रितसर विधेयक पारित करुन त्याचे कायदयात रुपांतरण करणे आवश्यक असते. अन्यथा असा अध्यादेश व्यपगत होतो. नागपूर येथे दिनांक १३/१२/९९ ला सुरु झालेल्या अधिवेशनात अशा प्रकारे विधेयक पारित न झाल्याने उक्त अध्यादेश दिनांक २३/१/२००० पासून व्यपगत झालेला आहे.

वरील परिस्थितीत उक्त अध्यादेशानुसार शासनाने निर्गमित केलेले खालील आदेश/अधिसूचना आता दिनांक २४/१/२००० पासून संपुष्टात आले आहेत :-

| क्र. | शासन निर्णय/अधिसूचना/ क्रमांक / दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्र.:- एनएपी १०९९/ प्र.क्र.३२(दोन)/ल-२, दिनांक २३/८/१९९९ | ग्रामीण भागात शेत जमिनीच्या निवासी प्रयोजनासाठी वापर करण्यासाठी अकृषिक परवानगी व अकृषिक आकरणी लागू नसणे |
| २ | शासन निर्णय क्र:- एनएपी १०९९/ प्र.क्र.३२(२)/ल-५,दि.२४/८/९९ | विहित मुदतीत वसूल न झालेल्या जमीन महसूलाच्या थकबाकीवर आपोआप व्याज लागू होणेबाबत. |
| ३ | शासन अधिसूचना:- पीडब्ल्यूआर-१०९९/प्र.क्र.३२(तीन)/ल-२, दिनांक २३/९/९९ | महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ मधील तरतुदीनुसार अकृषिक आकारणी लागू करणे व वसूल करणे तसेच अकृषिक परवानगी देणे. अनधिकृत अकृषिक वापराबाबत कारवाई करणे नियमानुकूल करणे तसेच यांचे अधिकार आयुक्त महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपरिषद यांना प्रदान करणेबाबत. |
| ४ | शासन निर्णय क्र.:एनएपी-१०९९ /प्र.क्र.३२(तीन)/ल-२, दि.२७/९/९९ | महानगरपालिका आणि नगरपालिका यांनी अकृषिक परवानगी देण्याबाबतची कार्यपध्दतीबाबत. |

(कृ.मा.प.

वर नमूद अध्यादेशाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६, मध्ये ज्या सुधारणा केल्या होत्या त्या दिनांक २४/१/२००० पासून संपुष्टात आल्या आहेत. परिणामी आता दिनांक २४/१/२००० पासून अधिनियमामध्यें या संदर्भात दि. ६/८/१९९९ पूर्वी ज्या तरतुदी होत्या त्या लागू राहातील, म्हणजेच यापुढे ग्रामीण भागात निवासी वापरासाठी अकृषिक परवानगी घ्यावी लागेल आणि त्यावर अकृषिक आकारणीही लागू होईल. तसेच महानगरपालिका /नगरपालिका क्षेत्रात अकृषिक परवानगी देणे, अनधिकृत वापराच्या संदर्भात नियमानुसार कारवाई करणे वा अनधिकृत अकृषिक वापर नियमानुकूल करणे व त्यांच्या अधिकार क्षेत्रात अकृषिक आकारणी वसूल करणे याबाबतची कार्यवाही/अंमलबजावणी ही कर्तव्ये जिल्हाधिकारी व त्यांचे जिल्हयातील महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून नियमानुसार पार पाडली जातील.

सर्व संबंधितांनी कृपया वरील सूचनांची नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( बा.वि.मराठे )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग.

प्रति,